श्री.रामदास चव्हाण, अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :- समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे-५

दूरध्वनी क्रमांक :-२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :- स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई-मेल:- sdd@punecorporation.org
जावक क्रमांक :- सविवि/ 3
दिनांक :- 01/04/2026

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.

अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. २ /२०२६
ऑन लाईन अर्ज क्र. PUMCO/A/2026/60069

अपिलार्थी नांव व पत्ता :-
श्री. अभिषेक डोर्नल
रा. जिवेश्वर मंदिरा जवळ, गुरूवार पेठ, पुणे
मो. नं. 8805379164

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
श्री. असंग पाटील,
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

श्री. अभिषेक डोर्नल------ अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी दिनांक ५/२/२०२६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली ऑन लाईन अर्ज क्र. PUMCO/A/2026/60069 माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ५/२/२०२६ | ४/३/२०२६ | १६/२/२०२६ | - | - |

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक २३/१२/२०२५रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना दिलेल्या माहिती अपुर्ण असल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| २३/२ /२०२६ | १५/३ /२०२६ | होय | लागू नाही | ४/३ /२०२६ |

**प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-** दिनांक १२/३/२०२६, स. ११.३० वाजता.

**सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-** दिनांक १२/३/२०२६रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: अनुपस्थित होते.

**सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-** दिनांक १२/३/२०२६ रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिका सर्व विभागामध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत कार्यरत असलेल्या उमेदवारांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर, त्यापैकी कोणास करार तत्त्वावर (contract basis/outsourcing) किंवा मानधन तत्त्वावर (Honorarium basis) किंवा इतर कोणत्याही पद्धतीने पुन्हा नियुक्त करण्यात आले आहे काय? | नाही. |
| २ | जर होय, तर विभागानुसार व पदनिहाय (Designation- Wise) खालील माहिती देण्यात यावी: पदाचे नांव (Designation) -त्या पदावर पुनर्नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांची संख्या- नियुक्तीचा प्रकार (करार / मानधन) | लागू नाही |
| ३ | वरील पुनर्नियुक्ती संदर्भातील joining Letter / नियुक्ती आदेशांच्या छायांकित प्रती पदनिहाय उपलब्ध करून द्याव्यात. | लागू नाही |

"विवेचन"

सदर बाबत अपिलार्थी यांना अपिल सुनावणीस उपस्थित राहणेबाबत दि. ४/३/२०२६ रोजी ऑन लाईन आदेश पाठविणेत आले होते व त्यांनी सुनावणीस उपस्थित राहणेकरीता अर्जात नमूद दुरध्वीनवर संपर्क केला असता त्यांना सुनावणीस उपस्थित राहणे शक्य नसल्याचे तसेच याबाबत मी फोनकरून कळवतो असे सांगणेत आले होते .सबब अपिल सुनावणीस अनुपस्थित होते.

"आदेश"

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी हे अपिल सुनावणीस अनुपस्थित असल्याने सदरचे अपिल निरस्त करणेत येत आहे.

(रामदास चव्हाण)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.
टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

४) श्री. अभिषेक डोर्नल, रा. जिवेश्वर मंदिरा जवळ, गुरूवार पेठ, पुणे मो. नं. 8805379164

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी